


स्थापना : १९७२

...शैक्षणिक प्रगतीचा चढता आलेख...

किनवट शिक्षण संस्था, किनवट द्वारा संचलित

# बळीराम पाटील महाविद्यालय

## किनवट जि.नांदेड

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

- नॅक पुर्नमूल्यांकित -



# माहिती पुस्तिका

## (कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय)

## : प्रवेश अर्जासह :

दुरध्वनी : प्राचार्य कार्यालय : 222040, मो.9423657498

मुल्य : ५० रु.

रजि.एन.डी.डी. /१०/७१/ दि.१६ ऑगस्ट १९७१


# किनवट शिक्षण संस्था, किनवट जि.नांदेड

संस्थापक अध्यक्ष : स्व.उत्तमरावजी राठोड

## :: कार्यकारणी ::


| | |
|---|---|
| मा.श्री प्रफुल्ल प्रकाशराव राठोड | अध्यक्ष |
| मा.श्री गंगारेड्डी बैनमवार | उपाध्यक्ष |
| मा.श्री आनंदराव पाटील | उपाध्यक्ष |
| मा.श्री शंकररावजी चाडावार | सचिव |
| मा.श्री दत्तरामजी राठोड | सहसचिव |
| मा.श्री ठाकुर नारायण जाधव | सहसचिव |
| मा.श्री जसवंतसिंग सोखी | कोषाध्यक्ष |
| मा.श्री डी.बी.पाटील | सदस्य |
| मा.श्री यादवरावजी नेम्मानीवार | सदस्य |
| मा.श्री इसाखॉन सरदारखॉन | सदस्य |
| मा.श्री रामरावजी जाधव | सदस्य |
| मा.श्री अल्लाबक्ष अ.रजाक | सदस्य |
| मा.श्री दिनकररावजी चाडावार | सदस्य |
| मा.श्री सखाउल्लाखान | सदस्य |
| मा.श्री नारायणरावजी सिडाम | सदस्य |


*आमचे श्रध्दास्थान / प्रेरणास्थान*



## स्व.उत्तमरावजी राठोड

संस्थापक अध्यक्ष,
किनवट शिक्षण संस्था, किनवट

जन्म : दि. २१ फेब्रु. १९३० मृत्यु : दि. ७ मार्च १९९७



# प्रफुल्ल प्रकाश राठोड

अध्यक्ष, किनवट शिक्षण संस्था, किनवट.
अध्यक्ष, बळीराम पाटील मिशन, मांडवी.
मा.अधिसभा सदस्य, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.
माजी सदस्य, जि.प.नांदेड





'धर्म ह्दयाकडून ह्दयाकडे जातो' अशी एक महत्वपुर्ण म्हण आहे. शिक्षणाच्या बाबतीत तर ही म्हण अधिक यथार्थ आहे. अंत:करणातूनच खरे शिक्षण बाहेर पडु शकेल. मानवी अंत:करणाच्या अंतरंगातील तारा छेडल्या गेल्याशिवाय विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्व विकसित होणे शक्य नाही. यासाठी पुन्हा विकसित अंत:करणाची आवश्यकता आहे. विद्यार्थी जीवनाच्या सर्व स्पंदनांची नोंद घेणारे शुध्द अंत:करण हवे आहे. आपण विद्यार्थ्यांहुन श्रेष्ठ व निराळे आहोत किंवा आपले स्थान वरचे आहे. ही जाणीव न ठेवता आपण त्यांचे एक स्नेही व सहकारी आहोत, असे समजून एकरुप होण्याची, त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा शिक्षक मुलांना चांगले शिक्षण देऊ शकेल. मी स्वत:ला पुढील प्रमाणे प्रश्न विचाराच्या प्रारंभ केला. मी स्वत:वर जितके प्रेम करतो, तितकेच विद्यार्थ्यांवर करु शकेन काय ? मी स्वत:ला जशी क्षमा करतो, तशी विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीबद्दल क्षमा करु शकेन काय ? मुलांच्या जीवनातील सर्व अवस्थांत मी त्याच्याशी पूर्णपणे एकरुप होऊ शकेन काय ? मी हे करु शकेन असे मला वाटले आणि समर्पणाच्या भावनेतुन मी शिक्षकाचे काम स्वीकारले.

– स्वामी रामानंद तीर्थ

दोन शब्द...

प्रिय विद्यार्थी मित्रहो,

प्रतिवर्षा प्रमाणे यावर्षीही प्रवेश प्रकियेच्या या उंबरठ्यावर आपले स्वागत करतांना मला अतिशय आनंद होत आहे. १९७२ पूर्वी किनवट तालुक्यात उच्च शिक्षणाची सोय कुठेच नव्हती. शालांत शिक्षणानंतर या तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी नांदेड, पुसद, यवतमाळ अशा दूरच्या अंतरावर असलेल्या शहरात जावे लागत असे. मुळातच किनवट तालुका अतिदुर्गम, आदिवासी, मागासलेला तालुका असल्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या पालकांना आपल्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविणे शक्य नव्हते. परिणामत: येथील विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू लागले. उच्च शिक्षणाची होत असलेली ही आबाळ थोर समाज सुधारक स्व.बळीराम पाटील यांच्या सुधारणावादी दृष्टीतून सुटली नाही. त्यांनी किनवट येथे महाविद्यालय काढण्याची कल्पना सतत मांडली. त्यांच्या या कल्पनेस मूर्तरुप देण्याचे श्रेय हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतरावजी नाईक (माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांना आहे. त्यांच्याच प्रेरणेतून आणि किनवट तालुक्याच्या विकासाचा अहोरात्र ध्यास असलेले स्व.उत्तमरावजी राठोड (माजी खासदार व राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य), तसेच हुतात्मा जे.नागोरावजी आणि येथील शिक्षण प्रेमी यांच्या प्रयत्नातून किनवट शिक्षण संस्थेची १६ ऑगस्ट १९७१ मध्ये स्थापना होऊन जून १९७२ पासून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरु करण्यात आले.

थोर समाजसुधारक बळीराम पाटील यांच्या स्वर्गवासानंतर त्यांचे नांव या महाविद्यालयास द्यावे, असा आग्रह येथील शिक्षण प्रेमींचा होता, म्हणून बळीरामजी पाटील यांच्या बद्दल असलेल्या कृतज्ञतेतून १९७६ मध्ये 'बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान' असे नामकरण करण्यात आले. तसेच संस्थापक अध्यक्ष या नात्याने स्व. उत्तमरावजी राठोड यांनी ह्या संस्थेची धुरा सांभाळली व विकासाचा पाया मजबूत केला. म्हणूनच या संस्थेचे श्रध्दास्थान आणि प्रेरणास्थान स्व.उत्तमराव राठोड हेच होत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने 'स्व.उत्तमरावजी राठोड आदिवासी संशोधन केंद्र' आपल्या महाविद्यालयाच्या अधिकार कक्षेत सुरु केले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याचे हे केंद्र बनेल याचा मला सार्थ आत्मविश्वास आहे. स्व.उत्तमरावजी राठोड यांच्या पश्चात या संस्थेची धुरा मा.प्रफुल्ल प्र.राठोड आणि सन्माननीय पदाधिकारी व सदस्य समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय व संस्था विकासाच्या पथावर अधिक जोमाने वाटचाल करीत आहे. अशा या महाविद्यालयात आपण प्रवेश घेत आहात. त्या बद्दल मी आपले हार्दिक स्वागत करतो. थोर परंपरा लाभलेल्या या महाविद्यालयाची माहिती या पुस्तिकेद्वारे देतांना मला अत्यानंद वाटतो.

डॉ.बेंबरेकर एस.के.
प्राचार्य



## :: महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये ::

१) संस्थापक अध्यक्ष स्व.उत्तमरावजी राठोड यांची ध्येयपूर्ती व स्वप्नपुर्ती करणारे, किनवट सारख्या अतिदूर्गम, आदिवासी, मागासलेल्या तालुक्यातील एकमेव पहिले महाविद्यालय.
२) ११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान शाखे करिता अभ्यासाची उत्तम सोय तसेच व्यावसायिक, अभ्यासक्रम, संगणक शास्त्र, संरक्षण शास्त्र, भूगोल, गृहशास्त्र इत्यादी विषयांची सोय.
३) पदवी स्तरावर कला, वाणिज्य व विज्ञान शाखे करिता अभ्यासाची उत्तम सोय तसेच विज्ञान शाखेच्या तिन्ही वर्गा करिता संगणक शास्त्राची सोय आणि कला शाखेत ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयांची सोय.
४) निसर्गरम्य वातावरणात महाविद्यालयाची भव्य इमारत.
५) भव्य क्रींडागण, विविध खेळांची सोय, राज्य व राष्ट्रीय स्तरावर दरवर्षी महाविद्यालयातील खेळाडूंचा सहभाग.
६) मुलीं करिता विविध क्रीडा स्पर्धेत सहभागाची सोय.
७) अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वृंद.
८) उत्कृष्ट निकालाची परंपरा.
९) समृध्द ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा आणि अभ्यासिकेची स्वतंत्र सोय.
१०) कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाकरिता राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)
११) कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयाकरिता राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)
१२) विद्यार्थी सहाय्य निधी आणि पुस्तकपेढी.
१३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय.
१४) भितीपत्रक आणि वार्षिकांक (उन्मेष)
१५) विद्यार्थी संसद (कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाकरिता गुणवत्तेवर आधारीत)
१६) एम.एस.सी.आय.टी.चे परीक्षा केंद्र म्हणून मान्यता.
१७) बी.एड.पात्रता परीक्षा केंद्र म्हणून मान्यता.
१८) व्यवसायीक अभ्यासक्रमाची सुविधा विषय १) कॉम्प्युटर सायन्स २) इलेक्ट्रॉनिक्स ३) क्रॉप सायन्स.
१९) १०० मुलींसाठी वस्तीगृहाची सोय.
२०) महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या प्रवासासाठी (येणे व जाणे) संस्थेच्या वतीने नवीन स्वत:च्या बसची व्यवस्था.

## :: प्रवेशासाठी नियम व माहिती ::

या महाविद्यालयात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून खालील कागदपत्रे व दाखले, मूळ प्रतीत व प्रत्येकी दोन छायांकित प्रतीसह सादर केले जाणे आवश्यक आहे.

१) गुण पत्रिका. २) स्थालांतराचा दाखला. ३) ई.बी.सी. दाखला.
४) जातीचा दाखला (Caste Certificate) (मागास जाती पैकी असल्यास)
५) स्थलांतर प्रमाण पत्र (Migration Certificate)
(दुसऱ्या विद्यापीठाची/बोर्डाची परिक्षा विद्यार्थ्याने पास कलेली असेल तर)
६) खंड प्रमाणपत्र. ७) २ पासपोर्ट फोटो

## :: प्रवेश ::

१) अर्जाचा नमुना विद्यार्थ्याने स्वहस्ते भरला पाहिजे. प्रवेशाविषयीचे सर्व नियम नीट काळजी पूर्वक वाचून व आवश्यक माहिती अचूक भरुन मग त्याने तो अर्ज कार्यालयात द्यावा.

२) प्रवेशाच्या वेळी प्रत्येक विद्यार्थ्याला ठराविक शुल्क भरावे लागते. नि:शुल्क शिकण्यासाठी व शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी पात्र असलेल्यांनी नियमानुसार प्रवेश मिळवितांना कॉलेजच्या द्वारे त्यासाठी अर्ज करावा.

३) प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्रावर मा.प्राचार्यांची मान्यता मिळविण्यासाठी पासपोर्ट आकाराचे स्वत:चे छायाचित्र ओळखपत्रावर चिटकविले पाहिजे. प्रस्तुत ओळखपत्रा खेरीज विद्यार्थ्याला वर्गात उपस्थित राहता येणार नाही.

४) विद्यार्थ्यांनी ओळखपत्रास लागणारा फोटो श्वेत कपडे परिधान करुन काढलेला असावा.

५) १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ११ वीत प्रवेश मिळेल. मॅट्रीकच्या निकालानंतर १५ दिवसांचे आत प्रवेश घ्यावा.

६) इ. ११ वी कला, विज्ञान आणि वाणिज्य या प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता १२० एवढी आहे. त्यात शासकीय नियमाप्रमाणे मागासवर्गीयांना आरक्षण राहील.

७) इ.१२ वी चे प्रवेश महाविद्यालय सुरु झाल्यानंतर १५ दिवसांचे आत पूर्ण करावेत.

८) इ.१२ वी चे वर्ग १७ जून पासून नियमितपणे सुरु होतील. सर्व विद्यार्थ्यांनी दिलेल्या तारखेपासून वेळापत्रकानुसार आपल्या वर्गांना नियमितपणे उपस्थित राहावे.

९) प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या वर्गात प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पात्रतेच्या दाखल्यासाठी (Eligibility Certificate) अर्ज शुल्कही प्रवेश अर्जा सोबत भरणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय सर्व प्रवेश तात्पुरते (Provisional) समजण्यात येतील. तात्पुरता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी वरील नियम लागू राहील. ज्या विद्यार्थ्यांना या अगोदर पात्रता प्रमाणपत्र क्रमांक मिळाला असेल, परंतु ज्या वर्षी त्यांनी शाखा बदलून प्रवेश घेतला असेल,अशांनी देखील पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे अनिवार्य आहे.

१०) विद्यापीठाच्या नियमांनुसार प्रत्येक विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी करुन घेतली पाहिजे.

११) प्रत्येक विद्यार्थ्याने कॉलेजच्या सर्व परीक्षा देणे आवश्यक आहे. परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो. ही दंडाची रक्कम विद्यार्थी कल्याण निधीसाठी वापरली जाते.

१२) महाविद्यालयात दाखल केलेली मूळ कागदपत्रे महाविद्यालयीन शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत कुठल्याही सबबीखाली परत मिळणार नाहीत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या पुरेशा सत्यप्रती स्वत:जवळ ठेवाव्यात.



## :: विद्यापीठ विहीत पदवी प्रवेश नियम व प्रक्रिया ::

१) पदवी स्तरावरील सर्व प्रवेश गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील.

२) विहीत मुदतीत आपली नावे नोंदविलेले अर्जदार च प्रवेशास पात्र ठरतील.

३) मान्य प्रवेश क्षमतेपक्षा ५२% जागा शासन नियमानुसार मागसवर्गीय अर्जदारांसाठी राखीव असतील. तसेच नियमाप्रमाणे विद्यार्थीनी / महिलांसाठी ३०% जागा आरक्षित राहतील.

४) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १२ वी/प्रथम पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व पात्र अर्जदारांना प्रवेश दिल्यानंतर काही जागा रिक्त राहिल्या तर रिक्त जागांवर प्रवेशासाठी खालील प्रमाणे प्राध्यान्यक्रम ठरविण्यात येईल.

अ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी.

ब) राज्यातील इतर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी.

क) राज्या बाहेरील विद्यार्थी.

५) पदवी स्तरावरील विहीत प्रवेश क्षमतेपैकी ८५% जागा गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील. संस्थाचालक आणि प्राचार्य यांना प्रत्येकी ५% जागा आपल्या अधिकारात भरता येतील आणि उर्वरित ५% जागा क्रीडा व सांस्कृतीक क्षेत्रात विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले नसतील तर वरील जागांवर शिक्षण संस्था चालकांनी प्राचार्याशी सल्लामसलत करुन प्रवेश द्यावा. थोडक्यात हे सर्व खालील प्रमाणे राहतील.

अ) ८५% गुणवत्तेनुसार

ब) ५% जागा संस्था चालकांच्या अधिकारातील.

क) ५% जागा प्राचार्यांच्या अधिकारातील.

ड) ५% जागा क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यासाठी.

६) स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, आजी व माजी सैनिकाचे पाल्य, प्रकल्पग्रस्तांचे पाल्य व अपंग या सर्व संवर्गाना मिळून विहित अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमते व्यतिरिक्त २% वाढीव जागांवर प्रवेश देण्यात येईल.

टीप :

१. नियम क्र. ५ ब, क, ड, आणि नियम क्र. ६ अन्वये निर्दिष्ट जागा फक्त नांव नोदंविलेल्या अर्जदारांमधूनच भरणे आवश्यक आहे.

प्रवेशासाठी पदवी परीक्षेत संबंधित विषयात खालीलप्रमाणे किमान टक्केवारी असणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | विद्याशाखा | संदर्भ | | किमान सरासरी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | खुला | राखीव | |
| १. | मानव्य (कला) व सामाजिक शास्त्रे | ४५ | ४० | ४० |
| २. | वाणिज्य | ४५ | ४० | ४० |
| ३. | विज्ञान | ४५ | ४० | ४० |

## :: शुल्क व अनामत ::

१) प्रत्येक विद्यार्थ्याने संपूर्ण सत्राचे शुल्क व आवश्यक ती अनामत दिलेल्या मुदतीत भरावी.

२) एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

३) शुल्क विषयक तक्त्यानुसार ठरविलेले शुल्क दिलेल्या मुदतीत भरावे.

४) विद्यार्थ्यांना सोयीचे जावे म्हणून शैक्षणिक शुल्क देण्यासाठी पुढील प्रमाणे दोन हप्ते पाडण्यात आलेले आहेत.
   अ) पहिला हप्ता – प्रवेश घेतेवेळी
   ब) दुसरा हप्ता – २५ नोव्हेंबर पूर्वी

५) दिलेल्या मुदतीच्या आत शिष्यवृत्ती व सवलतीसाठी अर्ज न केल्यास त्या विद्यार्थ्याला कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

६) विद्यार्थ्यांकडून हरवलेल्या कोणत्याही पावतीसाठी कॉलेज जबाबदार राहणार नाही व त्या रक्कमेसाठी सबबीवर दुसरी पावती दिली जाणार नाही.

७) ग्रंथालयासाठी अनामत रक्कम भरणे प्रत्येकास अनिवार्य आहे.

८) ग्रंथालयासाठीची भरलेली अनामत रक्कम महाविद्यालय सोडल्यानंतरच मिळेल. मूळ पावती शिवाय अनामत रक्कम मिळणार नाही.

*****



## Jr.Fees XI Arts, Com., Science

| Sr.No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | 15 |
| 2 | Magzine Fee | 25 |
| 3 | Identiy Card Fee | 10 |
| 4 | Prospect | 50 |
| 5 | Gimkhana Fee | 25 |
| | Total Fee | 125 |

## Scholarship Holder

### Jr.Fees XII Arts, Com.

| No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | 18 |
| 2 | Term Fee | 36 |
| 3 | Magzine Fee | 25 |
| 4 | Identiy Card Fee | 10 |
| 5 | Prospect Fee | 50 |
| 6 | Gimkhana Fee | 30 |
| 7 | Misc Fee | 20 |
| | Total Fee | 189 |

### Jr.Fees XII Science

| No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Admission Fee | 18 |
| 2 | Term Fee | 36 |
| 3 | Magzine Fee | 25 |
| 4 | Identiy Card Fee | 10 |
| 5 | Prospect Fee | 50 |
| 6 | Gimkhana Fee | 30 |
| 7 | Lab Fee | 70 |
| 8 | Misc Fee | 20 |
| | Total Fee | 259 |

## Readmission / Open Category

### Jr.Fees XII Arts, Com.

| No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Tution Fee | 216 |
| 2 | Admission Fee | 18 |
| 3 | Term Fee | 36 |
| 4 | Magzine fee | 25 |
| 5 | Identy Card Fee | 10 |
| 6 | Prospect | 50 |
| 7 | Gimkhana Fee | 30 |
| 8 | Misc Fee | 20 |
| | Total Fee | 405 |

### Jr.Fees XII Science

| No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Tution Fee | 216 |
| 2 | Admission Fee | 18 |
| 3 | Term Fee | 36 |
| 4 | Magzine fee | 25 |
| 5 | Identy Card Fee | 10 |
| 6 | Prospect | 50 |
| 7 | Gimkhana Fee | 30 |
| 8 | Lab Fee | 70 |
| 9 | Misc Fee | 20 |
| | Total Fee | 475 |

## Statement Showing Details of Fees Structure for all Faculties Granted and Non-Granted Colleges

| Sr. No. | Particulars | B.A.& B.Com | | | B.Sc. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | I Year | II Year | III Year | I Year | II Year | III Year |
| 1) | Registration Fees | 10 | | | 10 | | |
| 2) | Admission Fees | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 3) | Library Fees | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 4) | Student Aid Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 5) | Medical Exam Fees | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 6) | Social Gathering Fees | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 |
| 7) | Student Council Fees | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| 8) | Gyamkhana Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 9) | Magazine Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 10) | Eligibility Fee | 100 | | | 100 | | |
| 11) | Chancelor's Office Actlties Fee | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| 12) | Tution Fees | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 | 1000 |
| 13) | Identity Card Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 14) | College Devlopment | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 15) | University Sports | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 16) | Ele Form Fees | 10 | | | 10 | | |
| 17) | Lab Fee | | | | 300 | 300 | 300 |
| 18) | Student Safty Insurance | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 |
| 19) | Book Bank | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 20) | Emeregency Fee | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| 21) | Student Welfare Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 22) | Self Finance Unit | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 23) | Miscellaneos Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 24) | Yoth Festival Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 25) | Aswmedh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 26) | NSS Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 27) | Home Exam Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 28) | Zonal Sports Council Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| | Total Fees | 1905 | 1795 | 1795 | 2205 | 2095 | 2095 |
| | | 905 | 795 | 795 | 1205 | 1095 | 1095 |
| 29) | Prospect | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| | | 1955 | 1845 | 1845 | 2255 | 2145 | 2145 |



# :: अभ्यासक्रम ::

## कनिष्ठ महाविद्यालय विविध अभ्यासक्रम

कला शाखा
११ वी, १२ वी

वाणिज्य शाखा
११ वी १२ वी

विज्ञान शाखा
विज्ञान ११ वी व १२ वी

व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत " कार्यालय व्यवस्थापन "

बी.ए. त्रैवार्षिक अभ्यासक्रम
बी.कॉम. त्रैवार्षिक अभ्यासक्रम
बी.एस्सी. त्रैवार्षिक अभ्यासक्रम

### विषय निहाय अभ्यासक्रम : कनिष्ठ महाविद्यालय

कला शाखा
११ वी आणि १२ वी

तुकडी " अ " (प्रवेश क्षमता १२०)

अनिवार्य विषय : इंग्रजी
अनिवार्य भाषा : मराठी / हिंदी
ऐच्छिक विषय : खाली दिलेल्या प्रत्येक विषय गटातून एक या प्रमाणे कोणतेही चार विषय निवडता येतील.

| विषय गट | विषय |
|---|---|
| अ) | राज्यशास्त्र/भूगोल |
| ब) | समाजशास्त्र/संरक्षणशास्त्र |
| क) | इतिहास / अर्थशास्त्र |
| ड) | कार्यालय व्यवस्थापन |

टीप : कार्यालय व्यवस्थापन हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदी व मराठी हे विषय (अनिवार्य अथवा ऐच्छिक) घेता येणार नाहीत. (प्रवेश क्षमता फक्त २०).

## : वाणिज्य शाखा :

११ वी आणि १२ वी

अनिवार्य विषय : इंग्रजी

अनिवार्य भाषा : मराठी / हिंदी

ऐच्छिक विषय : १) सचिवांची कार्यपध्दती

२) व्यापारी संघटन

३) पुस्तपालन व लेखाकर्म

४) अर्थशास्त्र

## : विज्ञान शाखा :

११ वी आणि १२ वी

अनिवार्य विषय : इंग्रजी

अनिवार्य भाषा : मराठी / हिंदी / माहिती व तंत्रज्ञान

ऐच्छिक विषय : १) गणित

२) भौतिकशास्त्र

३) रसायनशास्त्र

४) जीवशास्त्र

२००८-२००९ या शैक्षणिक वर्षापासून पर्यावरणशास्त्र ११ वी साठी अनिवार्य राहील.

## :: व्यवसायीक अभ्यासक्रम ::

| No. | Subject | Theory | Practical | Total |
|---|---|---|---|---|
| 1) | Computer Science | 80 | 120 | 200 Marks |
| 2) | Electronics | 80 | 120 | 200 Marks |
| 3) | Crop Science | 80 | 120 | 200 Marks |

## विषय निहाय अभ्यासक्रम वरिष्ठ महाविद्यालय

महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय/पेपर विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा भाग म्हणून निवडता येतील. आणि त्याच विषयांच्या/पेपरच्या परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल.

प्रथम वर्षात प्रवेशाचे वेळी घेतलेले ऐच्छिक विषय व द्वितीय भाषा पुढील वर्षी बदलता येणार नाहीत. पदवी वर्गाच्या प्रत्येक शाखेत अनिवार्य विषय आणि द्वितीय भाषा प्रथम व द्वितीय वर्षापर्यंतच असेल. तृतीय वर्षी फक्त ऐच्छिक विषय राहतील.

स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठान्तर्गत २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून कला व विज्ञान शाखा वगळून केवळ वाणिज्य शाखे करिता पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याकरिता १०० गुणांचे प्रकल्प कार्य (Project Work) अनिवार्य करण्यात आलेले आहे. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रथम सत्राच्या सुरुवातीला प्रकल्प कार्याचा विषय देण्यात येईल. प्रकल्प कार्यासंबंधीचा अहवाल अभ्यासक्रमाच्या अंतीम वर्षाच्या परीक्षेचा अर्ज भरण्यापूर्वी सादर करणे सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील. अन्यथा विद्यापीठ परीक्षेचा निकाल घोषित करणार नाही. जर केलाच तर अनुतीर्ण म्हणून घोषित होईल.



## : कला शाखा :

बी.ए.प्रथम व द्वितीय वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी

अनिवार्य भाषा : मराठी / हिंदी

टिप : मराठी/हिंदी या पैकी जी भाषा द्वितीय भाषा म्हणून घेतली असेल ती भाषा पुन्हा ऐच्छिक विषय म्हणून घेता येणार नाही.

## : बी.ए.प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष :

ऐच्छिक विषय : खाली दिलेल्या प्रत्येक विषय गटातून एक या प्रमाणे कोणतेही तीन विषय निवडता येतील.

| विषय गट | विषय |
|---|---|
| अ) | मराठी/हिंदी/इंग्रजी |
| ब) | इतिहास/समाजशास्त्र |
| क) | राज्यशास्त्र/अर्थशास्त्र/भूगोल |
| ड) | पर्यावरणशास्त्र बी.ए.तृतीय वर्षासाठी अनिवार्य राहील. |

## वाणिज्य शाखा (FACULTY OF COMMERCE)

### बी. कॉम. प्रथम वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी (101)

द्वितीय भाषा : मराठी (102) / हिंदी (103)

Paper - III - B.C. 1.1. : Business Communication (901)

Paper - IV - B.C. 1.2. : Business Mathematics (902)

Paper - V - B.C. 1.3. : Financial Accouting (905)

Paper - VI - B.C. 1.4. : Business Regulatory Frame Work(906)

Paper - VII - B.C. 1.5. : Business Economics (907)

Paper - VIII - B.C. 1.6. : Business Environment (908)

### बी.कॉम द्वितीय वर्ष

अनिवार्य विषय : इंग्रजी (201)

द्वितीय भाषा : मराठी (202)/ हिंदी (203)

निगम लेखांकन : Corporate Accounting (922)

Cmpany Law (923)

Bussiness Statics (924)

| | | |
|---|---|---|
| | : | Cost Accounting (925) |
| | : | Principal and Bussiness Management (926) |
| | : | Fundamentals of Enterpenship (930) |
| | : | Income Tax (927) |

## : बी.कॉम तृतीय वर्ष :

| | | |
|---|---|---|
| | : | Co-oper.&Rural Development (952) |
| | : | Management Accounting (954) |
| अंकेक्षण | : | Auditing (955) |
| उच्च लेखाकर्म | : | Advanced Accounting (956) |
| | : | Fundamental of Insurance (963) |
| | : | Indian Bus.System (964) |
| | : | Project work (967) |
| | : | Environmental Studies |

## विज्ञान शाखा (FACULTY OF SCIENCE)

### बी.एस्सी. प्रथम, द्वितीय वर्ष

| | | |
|---|---|---|
| अनिवार्य विषय | : | इंग्रजी |
| अनिवार्य भाषा | : | मराठी / हिंदी |

### बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष

ऐच्छिक विषय : खाली दिलेल्या प्रत्येक विषय गटातून एक या प्रमाणे कोणतेही तीन विषय निवडता येतील.

| | | |
|---|---|---|
| विषय गट | अ) | १) गणित (Mathematics) |
| | | २) भौतिकशास्त्र (Physics) |
| | | ३) रसायनशास्त्र (Chemistry) |
| | ब) | १) वनस्पतीशास्त्र (Botony) |
| | | २) प्राणीशास्त्र (Zoology) |
| | | ३) रसायनशास्त्र (Chemistry) |
| | क) | १) गणित (Mathematics) |
| | | २) भौतिकशास्त्र (Physics) |
| | | ३) संगणकशास्त्र (Computer Science) |



## :: ११ वी च्या विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना ::

११ वी च्या तिन्ही शाखेच्या विद्यार्थ्यांना खालील सूचनांचे कोटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

१) वार्षिक परीक्षा महाविद्यालयाचीच असल्यामुळे बारावीच्या वर्गात सहज बढती मिळेल अशी चुकीची कल्पना बाळगू नये.

२) ११ वी वार्षिक परीक्षेचा निकाल पुढील बाबींवर अवलंबून राहील.
   अ) सहामाही परीक्षेत मिळालेले एकूण गुण.
   ब) वार्षिक परीक्षेत मिळालेले एकूण गुण.
   क) प्रत्येक सत्रात द्यावयाच्या अनिवार्य टेस्ट ट्युटोरियल्स यांना मिळालेले गुण.

३) महाविद्यालयातील प्रत्येक तासाला उपस्थिती आवश्यक.

४) सत्रनिहाय टेस्ट व ट्युटोरियल्स न देणारे विद्यार्थी संभाव्य परिणामास सर्वस्वी जबाबदार राहतील.

५) वार्षिक परीक्षा देणे आवश्यक आहे.

६) वरील सूचना काळजीपूर्वक लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी अकरावीच्या अभ्यासालाही बारावी इतकेच महत्व देणे आवश्यक आहे.

## :: महाविद्यालयान्तर्गत परीक्षा ::

महाविद्यालयातर्फे सत्र परीक्षा व ११ वी इयत्तेची वार्षिक परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेस बसण्यासाठी प्रत्येक विषयात सरासरी ७५ टक्के हजेरी आवश्यक आहे. परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण प्रत्येक विषयात असणे आवश्यक आहे. इयत्ता ११ वी च्या सर्व विद्यार्थ्यांचा वार्षिक परीक्षेचा निकाल महाविद्यालयीन प्रथम सत्र परीक्षा, अंतर्गत चाचण्या गृहपाठ व वार्षिक परीक्षा यांचे गुण लक्षात घेऊन त्या आधारे लावला जाईल. परीक्षा न देणाऱ्या, वर्गात नियमीत उपस्थित नसणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या फी विषयक सवलती प्राचार्य रद्द करुन शकतील.

## :: परीक्षा ::

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे तर्फे १२ वी च्या व विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या पदवी परीक्षा प्रतिवर्षी दोन असतात.

१) वार्षिक परीक्षा २) पुरवणी परीक्षा

महाविद्यालयाने जाहीर केलेल्या शेवटच्या तारखेपासून परीक्षेचे अर्ज स्वीकारले जातील. परीक्षेच्या अर्जासोबत गुणपत्रिकेची मूळप्रत असल्याशिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

## :: राष्ट्रीय सेवा योजना ::

विद्यापीठाने महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेची दोन पथके मंजूर केलेली आहेत. या योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल. व्यक्तीमत्व विकासात रा.से.यो.चा लाभ विद्यार्थ्यांना होतो.

## :: शिष्यवृत्ती व सवलती ::

अ) आर्थिकदृट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना मिळणारी फी मधील सवलत (इ.बी.सी.) जे विद्यार्थी ई.बी.सी. योजनेचा फायदा घेतात अशा विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनेनुसार रु. ४००/- शैक्षणिक शुल्क भरावे लागेल.

ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १५,०००/-पेक्षा कमी असेल अशांनाच वरील सवलत मिळते. या गटात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी मॅजिस्ट्रेट, तहसीलदार, गॅझेटेड ऑफीसर किंवा सरपंच यांच्या सहीचे प्राप्तीविषयक प्रमाणपत्र सादर करावे लागेल. सदरील सवलतीसाठी अर्जाचा नमूना कार्यालयातून उपलब्ध होऊ शकेल. विद्यार्थीनींना १२ वी पर्यंत शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नाही. त्यांना प्रतिज्ञा पत्र भरावे लागेल.

ब) प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी मधील सवलत (पी.एस.टी.) ज्या विद्यार्थ्यांचे आई / वडील प्राथमिक / माध्यमिक शिक्षक असतील अशांना शासना कडून फी मध्ये सवलत मिळेल, त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरुन देणे आवश्यक आहे.

क) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी शैक्षणिक सवलत :- स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी असणाऱ्या शिष्यवृत्या व शैक्षणिक सवलती मिळविण्यासाठी जुलै महिण्यात अर्ज मागविले जातात.



कॉलेजच्या कार्यालयात हा अर्ज भरुन देण्याची शेवटची तारीख ३० जुलै ही आहे. पुढील अटी पूर्ण करणारा अर्जदार विद्यार्थीच या योजनेखाली शैक्षणिक सवलती साठी पात्र ठरु शकेल.

१) विद्यार्थी हा स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा किंवा नातू असला पाहिजे.

२) हा स्वातंत्र्य सैनिक महाराष्ट्राचा रहिवासी असला पाहिजे.

३) पालक स्वातंत्र्य सैनिक असल्याबद्दलचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

ड) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती (जी.ओ.आय.)

१) विद्यार्थ्यांची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय यादी मध्ये समाविष्ट असावयास पाहिजे. एस.एस.सी. च्या स्थलांतर प्रमाणपत्रावर जातीचा उल्लेख असला पाहिजे.

२) शासनाने किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्याने वेळच्या वेळी उत्तीर्ण झाले पाहिजे.अनुत्तीर्ण झाल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक शुल्क माफ होते.

३) विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.३८,०००/- पर्यंत असल्यास महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या दोनच पाल्यास ही सवलत मिळेल.

४) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ३८,०००/- आहे. त्यांना पूर्ण शिष्यवृत्ती मिळेल.

५) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.३८,०००/- पेक्षा अधिक व ५०,२२०/- च्या आत आहे. त्यांना अर्धी शिष्यवृत्ती मिळेल.

६) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ५०,२२०/- पेक्षा अधिक असेल त्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही.

७) स्थालांतराच्या प्रमाणपत्राची दुसरीप्रत असल्यास शिष्यवृत्ती मंजूर होत नाही.

इ) सरकारी गुणवत्ता शिष्यवृत्ती :

गुणवत्तेवर मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी उमेदवाराकडून अर्ज मागविले जातात. कार्यालयातून या अर्जाचा नमूना उपलब्ध होऊ शकेल कॉलेजच्या कार्यालयाकडे हा अर्ज पोहचविण्या साठी शेवटची तारीख २५ जुलै आहे.

उ) राज्य सरकारी गुणवत्ता शिष्यवृत्ती :

वरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याला उत्तीर्ण झालेल्या परीक्षेत ७० टक्के पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडून अर्ज महाविद्यालयाने सूचित केलेल्या वेळेच्या आत कार्यालयात दाखल करावा.

ऊ) अपंग विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकारची शिष्यवृत्ती :

शारिरीक दृष्ट्या अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारतर्फे ही शिष्यवृत्ती देण्यात येते. यासाठी ठराविक नमुन्यातील अर्ज महाविद्यालयामार्फत पाठवावे लागतात.

ए) ग्रामीण परिसरातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती :

ग्रामीण परिसरातील १० वी उत्तीर्ण झालेल्या व ७० टक्के गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यां साठी ११ वी इयत्तेत शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती द.म.रु. ५० असून ही रक्कम दोन वर्षासाठी मिळते.

ऐ) पुस्तकपेढी योजना (Book-Bank) :

विद्यार्थ्याने क्रमीक पुस्तकांच्या पंचवीस टक्के पुस्तकपेढी शुल्क भरल्यास केवळ एका शैक्षणिक वर्षासाठी पुस्तकपेढी मधून पुस्तके दिली जातात.



## :: विद्यार्थी आचार व अनुशासन संहिता ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विविध विभाग आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ९५ अंतर्गत तसेच महाराष्ट्र शासन माध्यमिक शालेय संहिता १९८१ च्या विभाग ८ नियम ५६.१ ते ५ अन्वये कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना विद्यार्थी आचार संहिता व अनुशासन संहिता लागू असेल.

विद्यार्थ्यांनी :

१. प्रवेश अर्जावर आपले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र लावावे आणि हमीपत्रावर स्वाक्षरी करावी.
२. प्रवेश पूर्ण होताच आपले ओळखपत्र प्राप्त करुन ते आपल्याजवळ नेहमी बाळगावे व सर्व विषयाच्या तासांना नियमितपणे उपस्थित रहावे.
३. भाषा विषयातील पाठ्यपुस्तके, प्रात्यक्षिक आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य वर्गात व प्रयोगशाळेमध्ये सोबत बाळगणे आवश्यक आहे.
४. वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त पूर्व परवानगीशिवाय सतत एक आठवडा गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द केला जाईल.
५. अनिवार्य व ऐच्छिक अशा सर्व विषयांत तसेच प्रात्यक्षिकात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. ही अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठ व बोर्ड परीक्षेस बसण्यास अपात्र मानले जाईल व एरवानगी नाकारली जाईल.
६. वर्गात जागरुक राहून वर्गातील शिस्तीचे कसोशीने पालन करावे.
७. संबंधित प्राध्यापकांच्या पूर्व परवानगीशिवाय वर्गात / प्रयोगशाळेत प्रवेश करु नये अथवा वर्ग/प्रयोगशाळा सोडून बाहेर जाऊ नये.
८. नेमूनदिलेले शिक्षण विषयक लेखनकार्य (ट्युटोरियल), गृहपाठ, प्रात्यक्षिके आणि चर्चासत्रे निष्ठापूर्वक करावीत.
९. संबंधित वर्गासाठी / विषयासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या वर्ग चाचण्या व सत्र परीक्षकांना बसावे.
१०. संबंधित अधिकाऱ्याच्या पूर्व संमतीशिवाय वसतिगृह, महाविद्यालय आणि विद्यापीठपरिसरात कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीला निमंत्रित करु नये.

११. विदेशी/आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या धार्मिक, राष्ट्रीय व सांस्कृतिक परंपरांचा व वारसाचा सन्मान करावा आणि त्यांना मित्रत्वाची वागणूक द्यावी.

१२. महाविद्यालयात आणि विद्यापीठाच्या ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या सोयींचा योग्य रितीने उपयोग करावा.

१३. ग्रंथालय व अभ्यास दालनात शांतता पाळावी.

१४. वृत्तपत्रे, नियतकालिके व संशोधनपत्रिका यांचे नियमितपणे वाचन करावे आणि आपल्या ज्ञानात भर घालावी.

१५. पाठ्यपुस्तकाशिवाय संदर्भ ग्रंथ वाचण्याची आवड विकसित करावी.

१६. ग्रंथालयातील पुस्तके, मासिके आणि नियतकालिके काळजीपूर्वक हाताळावीत. त्यांचे नुकसान केल्यास दंड आकारला जाईल.

१७. महाविद्यालय परिसर, परिसरातील इमारती, क्रीडांगणे, उद्याने इ. स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या कामी संबंधीत अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे.

१८. खाजगी शिकवण्यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने संबंधीत प्रशासनाला अर्थात् अधिकारी व प्राचार्यांना आवश्यक तेथे ज्यादा वर्ग/तास घेण्यासंबंधी विनंती करावी.

१९. महाविद्यालयात वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या अभ्यासाशी निगडीत आणि अभ्यासपूरक अशा उपक्रमांना तसेच विस्तार व समाजसेवा विषयक कार्यक्रमांना उपस्थित रहावे.

### अ. खेळाडू विद्यार्थी :

खेळाडूंनी नियमितपणे सरावासाठी मैदानावर/क्रीडांगणावर उपस्थित रहावे. अनियमित राहणाऱ्या व पुरेसे नैपुण्य प्राप्त न करणाऱ्या खेळाडूंचा विविध / आंतर महाविद्यालयीन/आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व करण्यासाठी विचार केला जाणार नाही.

### ब. राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) :

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमांना, शिबीर व विशेष शिबीरांना उपस्थित रहावे.



### क. कला व सांस्कृतीक उपक्रम :

सांस्कृतीक कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संगीत, नाटक व इतर सांस्कृतीक उपक्रमांच्या सरावासाठी नियमितपणे उपस्थित रहावे. जे विद्यार्थी सरावासाठी नियमितपणे उपस्थित राहणार नाहीत, त्यांची महाविद्यालय / विद्यापीठ महोत्सव व अन्य स्पर्धांसाठी प्रतिनिधी म्हणून निवड केली जाणार नाही.

२०. आपल्यामध्ये वैज्ञानिक व धर्मनिरपेक्ष दृष्टीकोण, श्रमप्रतिष्ठा व नैतिक मूल्ये आत्मसात करण्याचा तसेच लोकशाही जीवन व्यवस्था आणि राष्ट्रीय एकात्मता संबंधीच्या आदर्श तत्वांचा विकास आपल्या आचार-विचारातून जाणीवपूर्वक करावा.

२१. आपला सांस्कृतीक वारसा जतन करण्याचा आणि राष्ट्रीय विकासाच्या उद्दिष्टांशी त्यातील उदात्त मुल्यांचा सांधा जोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा.

## २) विद्यार्थी आणि त्यांचे वर्तन :

विद्यार्थ्यांनी :

१. आपल्या महाविद्यालयाच्या लौकीकात भर पडेल असेच वर्तन करावे आणि त्यास पोषक ठरतील अशाच उपक्रमात सहभागी व्हावे.

२. वसतिगृह आणि महाविद्यालय परिसरात आपल्या विनयशील वर्तणुकीने पोषक व सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करावे.

३. आपल्या मागण्या, अडचणी. तक्रारी इ. प्रशासनासमोर सनदशीर व शांततामय मार्गानेच सादर कराव्यात.

४. वर्गातील अध्यापन कार्यात व्यत्यय येईल असे वर्तन किंवा कृत्य करु नये.

५. रिकाम्या वेळात व्हरांड्यात फिरु नये आणि गोंगाट करु नये. उलट अशा वेळेत त्यांनी ग्रंथालयातील सोयींचा लाभ घ्यावा.

६. वसतिगृह आणि महाविद्यालय परिसरात कोणत्याही क्षणी आपली विचारणा केल्यास आपली ओळख पटवून देण्यास नकार देऊ नये आणि हुज्जत घालू नये.

७. प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही स्वरुपाचा कार्यक्रम, सभा, स्पर्धा, सहल, वनभोजन अशा उपक्रमांसाठी निधी संकलित करण्यात सहभागी होऊ नये. तसेच वर्गातील/व्हरांड्यातील फळ्यावर काहीही लिहू नये / खाडाखोड करु नये. असे कृत्य अनाधिकृत, नियमबाह्य व निषेधार्ह मानले जाईल व ते दंडास पात्र ठरेल.

८. देशात किंवा अन्यत्र कुठेही विद्यार्थी किंवा त्यांच्या समूहामार्फत प्रतिनिधीत्त्व करतांना शासकीय अधिकारी किंवा विद्यापीठ किंवा महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाशी संबंधीत असलेल्याअधिकाऱ्यां व्यतिरीक्त इतर व्यक्तींसमोर प्रतिनिधित्त्व करतांना विद्यापीठ, महाविद्यालय यांच्या नावाचा किंवा पत्त्याचा गैरवापर करु नये.

९. वसतिगृह / महाविद्यालयात / महाविद्यालयाच्या प्राचार्य यांच्या पूर्व व विशेष परवानगी शिवाय एखादी संघटना स्थापन करणे किंवा तिच्यात सहभाग घेणे किंवा तिची बैठक आयोजित करणे किंवा विद्यार्थ्यांना संबोधित करणे हे गैरकृत्य मानले जाईल.

१०. प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय एखादी खोली, दालन, कार्यालय, वर्गकक्ष, निवासस्थान किंवा परिसराचा भाग यांचा वापर करण्याच्या किंवा इतरांना करु देण्याच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

११. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा गैरफायदा घेण्यासाठी चुकीची विधाने करणे, चुकीची माहिती प्रस्तुत करणे तसेच प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजामध्ये अनधिकृतरित्या खाडाखोड करण्याच्या वृत्तीमध्ये सहभागी होवू नये. असे कारणे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा ठरतो.

१२. वसतिगृह आणि महाविद्यालय परिसरात शस्त्रास्त्रे, स्फोटके, रासायनिक आम्ल पदार्थ, वीष आणि विषारी पदार्थ,मादक पेये व गुंगी/नशा/झींग आणणारे गर्द सारखेपदार्थ आणू नयेत/जवळ बाळगू नयेत/ बाळगणाऱ्यांना सहकार्य करु नये.

१३. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रतिबंधित केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या वस्तू किंवा साधने जवळ बाळगू नयेत.

१४. धुम्रपान, तंबाखू सेवन, मद्यपान द्रव्ये आणि गुंगी/नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन निषेधार्ह मानले जाईल. अशा स्वरुपाचे वाईट व्यसनांना विद्यार्थ्यांनी बळी पडू नये.

१५. वसतिगृह/महाविद्यालयात कोणत्याही स्वरुपाचे असभ्य/निषिध्द/उध्दट वर्तन करु नये.

१६. वसतिगृह/महाविद्यालय परिसरात विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, अधिकारी व अन्य कोणाशीही असभ्य वर्तन करु नये/अशा प्रयत्नात सहभागी होऊ नये.



## ३) विद्यार्थी आणि परीक्षा :

१. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परीक्षेत कसल्याही प्रकारच्या अनुसूचित व अवैध मार्गाचा अवलंब करु नये.

२. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य द्यावे.

३. परीक्षांसंबंधी खालील नोंदविलेल्या कृतीमध्ये सामील होऊ नये.

अ) परीक्षा दालनात कोणत्याही प्रकारच्या मुद्रित, चक्रमुद्रित, टंकलिखित, हस्तलिखित, छायांकित, झेरॉक्स साहित्य आणू नये.

ब) परीक्षा चालू असतांना आपापसात बोलू नये/आवाज करु नये.

क) उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका किंवा तिचा भाग दालनाबाहेर घेऊन जाऊ नये.

ड) प्रश्नपत्रिका/उत्तरपत्रिका/पुरवणी उत्तरपत्रिका यांची आपापसात अदलाबदल करु नये. त्याचा कोणताही भाग फाडू नये.

इ) पर्यवेक्षक, केंद्रप्रमूख, सहकेंद्रप्रमूख, प्राचार्य किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या सूचनांचे कोटेकोरपणे पालन करावे.

ई) पर्यवेक्षक, केंद्रप्रमूख, सहकेंद्रप्रमूख, प्राचार्य, किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांशी उध्दट व आक्षेपार्ह वर्तन करण्याच्या कृतीमध्ये सामील होऊ नये.

फ) तोतया परीक्षार्थी परीक्षा दालनात बसविण्यासाठी प्रवेशपत्राचा गैरवापर करु नये.

५. परीक्षा दालनात प्रवेश करण्यापूर्वी किंवा परीक्षा चालू असतांना परीक्षेशी संबंधीत अधिकाऱ्याने तपासणी केली तर त्याला विरोध करु नये.

६. परीक्षेशी संबंधित अधिकाऱ्यांशी अधिकृतरित्या नियुक्त केलेल्या चौकशी समिती समोर हजर रहावे व साक्ष द्यावी.

७. परीक्षेत गैरप्रकारच्या संदर्भात विद्यापीठाने तयार केलेली शिक्षा सूची सर्व विद्यार्थ्यांना लागू राहील, हे लक्षात घ्यावे.

## ४. विद्यार्थी आणि प्राध्यापक :

विद्यार्थ्यांनी :

१. प्राध्यापकांचा आणि संबंधित अधिकाऱ्यांचा आदर करावा आणि एकंदर अध्यापन व्यवसायाचाच मान राखावा.

२. महाविद्यालय परिसरात व बाहेर प्राध्यापक आणि संबंधित अधिकाऱ्यांविषयी बोलतांना/चर्चा करतांना आदरपूर्वक उल्लेख करावा.

३. आपल्या वर्ग बंधू आणि भगिनींच्या संदर्भात प्राध्यापकांसमोर आणि विशेषतः प्रशासनासमोर बेछूट आरोप किंवा निंदानालस्ती करु नये.

४. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी प्राध्यापकाप्रमाणेच आदराने वागावे व त्यांच्याशी नम्रतापूर्वक बोलावे.

५. महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थीनी विषयी अश्लील, गलिच्छ, अपमानित व चारित्र्यहनन करणारा मजकूर वर्गातील फळ्यावर, भिंतीवर किंवा परिसरात कुठेही लिहू नये.

६. विद्यार्थीनींचा विनयभंग हा अक्षम्य स्वरुपाचा गुन्हा मानला जाईल.

## ५. विद्यार्थी आणि पालक :

१) विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगतीची व प्रश्नांची माहिती आपल्या पालकांना वेळोवेळी कळवावी.

२) विद्यार्थीनी आपल्या पालकांना महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमाबाबत चुकीची व दिशाभुल करणारी माहिती देऊ नये.

३) पालकांनी महाविद्यालयाच्या अधिकाऱ्याकडुन आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगती विषयी माहिती मिळवावी. आपल्या पाल्याच्या प्रगतीकडे त्यांनी जाणीवपुर्वक लक्ष द्यावे.

## ६) दंड/शिक्षा किंवा दंडात्मक कार्यवाही :

विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वर्तन आणि शिस्तीच्या अटी व नियमाचे उल्लंघन झाल्यास कोणताही विद्यार्थी त्यांच्या गैरवर्त्तनासाठी किंवा नियमबाह्य कृतीसाठी खाली निर्देशित केलेल्या एक किंवा अनेक दंडात्मक कार्यवाही अंतर्गत शिक्षा भोगण्यास पात्र राहील.

१) विद्यार्थ्यांकडून कुठल्याही गैरकृत्यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सक्त ताकीद देणे.

२) प्रवेश रद्द करणे

३) प्रवेश रद्द करुन पुढील प्रवेशास प्रतिबंध करणे.



४) शैक्षणिक सत्र रद्द करणे.

५) विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र रोखून धरणे किंवा रद्द करणे.

६) महाविद्यालय, संस्थेचे वसतिगृह किंवा निवास कक्षातून निश्चित कालावधीसाठी काढून टाकणे मात्र हा कालावधी पाच वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

७) महाविद्यालयातून काढून टाकणे.

८) तीनशे रुपयांपर्यंतचा दंड आकारणे.

९) फी किंवा अनामत रक्कम परत न करणे.

१०) जिमखाना, ग्रंथालय आणि इतर सवलतींचा विशिष्ट कालावधीसाठी लाभ घेण्यास मज्जाव करणे.

११) नादारी, शिष्यवृत्ती इतर सवलती आणि आर्थिक स्वरुपाचे फायदे रद्द करणे.

१२) विद्यापीठांतर्गत चालणाऱ्या महाविद्यालयात किंवा संस्थेच्या आणि विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेला बसण्यासाठी विशिष्ट कालावधी करिता मज्जाव करणे मात्र हा कालावधी पाच वर्षापेक्षा अधिक नसेल.

१३) गैरप्रकाराचे स्वरुप लक्षात घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

## ७) संहिता दुरुस्ती :

विद्यार्थी आचार संहिता अनुशासन संहितेत प्राचार्य आवश्यकतेनुसार बदल/ दुरुस्ती करतील.

## विद्यार्थ्यांकरिता काही महत्वाच्या सूचना

१) सायकल स्टॅण्ड सायकलधारक विद्यार्थ्यास प्रत्येक सत्रात २५/- रु. शुल्क आकारण्यात येईल.

२) स्थलांतर प्रमाणपत्राची दुसरीप्रत मिळविण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) मूळ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र हरवल्याची वर्तमान पत्रामधील जाहीरात.

२) मूळ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र हरवल्याची पोलीस स्टेशन मधील तक्रार नोंद.

३) पोलीस चौकशीचा अहवाल.

४) शपथपत्र

५) परिस्थितीनुरुप आवश्यक शुल्क.

३) जी.ओ.आय./एफ.एफ./पी.एस.टी./शिष्यवृत्ती धारकांना आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे दाखल केल्याशिवाय प्रवेशअर्ज कुठल्याही सबबीखाली स्वीकारले जाणार नाहीत.

४) प्रवेश अर्ज, मूळप्रमाणपत्र, पात्रता प्रमाणपत्रासाठी अर्ज, विविध शिष्यवृत्ती साठी अर्ज व तसेच इतर अन्य कागदपत्रे महाविद्यालयात दाखल करण्याच्या तारखा वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येतात. सर्व विद्यार्थ्यांनी आपणांसी संबंधीत असणारे अर्ज व इतर कागदपत्राची पूर्तता दिलेल्या वेळेच्या आत करावी. वेळेच्या आत कागदपत्र किंवा अर्ज इत्यादी दाखल न केल्यामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीस महाविद्यालय जबाबदार असणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी गंभीर नोंद घ्यावी.

५) विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी विशेष तयारी वर्गासारखे उपक्रम ना तोटा ना नफा तत्वावर राबविले जातील. यास विद्यार्थी, पालक अथवा इतरांना कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

## : शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या सूचना :

१) शिष्यवृत्ती फॉर्म विद्यार्थ्यांनी स्वत: संपूर्ण भरणे आवश्यक आहे. अपूर्ण भरलेले फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत.

२) आवश्यक सर्व कागदपत्र जोडलेले आहेत यांची खात्री विद्यार्थ्यांनी करुन घ्यावी.

३) प्रमाणपत्रावर खाडाखोड करणे किंवा खोट्या प्रमाणपत्राचा वापर करणे हा दखल पात्र गुन्हा आहे. याची विद्यार्थीनी जाणीव ठेवावी.

४) महाविद्यालयात नियमित उपस्थित राहणे आवश्यक आहे. हजेरी पूर्ण नसल्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

५) शिष्यवृत्ती संदर्भात सूचना फलकावर लावलेल्या सूचना काळजीपूर्वक व नियमित वाचण्याची सवय ठेवावी व सूचनांचे पालन करावे..

६) विद्यार्थ्याजवळ नेहमी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

७) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती संबंधी चौकशी करण्याकरिता, पालकांना, नातेवाईकाला अथवा मित्राला पाठवू नये.

८) प्रवेश घेतल्या नंतर प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षा फॉर्म भरणे आवश्यक आहे. परीक्षा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परत पाठविण्यात येईल व महाविद्यालयाची संपूर्ण फीस विद्यार्थ्यांकडून वसूल केली जाईल.

९) दिलेल्या मुदतीतच शिष्यवृत्ती उचलणे आवश्यक आहे जे विद्यार्थी मुदतीतच शिष्यवृत्ती उचलू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परत पाठविण्यात येत असते.

१०) विद्यार्थ्यांची वर्तणूक योग्य नसेल तर त्याची शिष्यवृत्ती नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.



## :: रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम ::

रॅगिंग करतो हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये रॅगिंग करणाऱ्याला कठोर शिक्षेची तरतुद असलेला अधिनियम प्रसारीत केला. रॅगिंग संदर्भात या विद्यापीठात रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली असुन या अधिनियमाच कठोरे अंमलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग हा दुसऱ्या विद्यार्थ्याला शारीरीक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्तन करण्याचा एक घृणास्पद अमानवी व विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्यांचे खच्चीकरण तर होतेच, परंतु रॅगिंगमुळे प्रसंगी एखादा विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

नवप्रवेशित विद्यार्थ्याला बोलुन, लिहून, चिडवून, उध्दटपणे वागुन त्याला/मानसिक किंवा शारीरीक इजा पोहचविणे.

इतरांनी मानहानी करणारे व लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे.

नवप्रवेशित विद्यार्थ्यांवर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोरजुलूम करणे, दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांना शिक्षा देणे इ.

प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.

## : रॅगिंग करणाऱ्याला शिक्षा :

या अधिनियमात रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतुद आहे. दोषी विद्यार्थ्याला खालीलपैकी एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जावे लागेल.

१) वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभांपासुन वंचित करणे.

२) शिष्यवृत्ती, फेलोशिप यापासुन वंचित करणे.

३) परीक्षेसाठी अपात्र ठरविणे.

४) निकाल राखुन ठेवणे.

५) कोणत्याही युवक महोत्सव, टुर्नामेंटमध्ये सहभागास प्रतिबंध करणे.

६) एक ते चार सत्रांपर्यत निलंबित करणे.

७) शिक्षण संस्थेतील प्रवेश रद्द करणे. तसेच इतर कोणत्याही शिक्षण संस्थेत काही काळासाठी प्रवेशापासुन वंचित करणे. आणीबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी/विद्यार्थीनींनी रॅगिंग प्रतिबंधक समितीकडे संपर्क साधवा.

## :: हमी पत्र ::

मी शपथपूर्वक लिहून देतो / देते की, वरील सर्व नियम मी वाचले आहेत, ते सर्व नियम मला मान्य आहेत. वरील नियमांचे उल्लंघन होणार नाही असे मी लेखी वचन देत आहे. वरील नियमाचे उल्लंघन माझ्या कडून झाले असता मला देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम परत करणे बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्यांची सही

संपूर्ण नांव ____________________

(आडनांव) (नांव) (वडिलांचे नांव)

संपूर्ण पत्ता ____________________

कायमचा पत्ता ____________________

### ग्रंथालयासंबंधीचे नियम :

१) प्रत्येक विद्यार्थ्यास ग्रंथालयातून दर आठवड्यास एक पुस्तक आपल्या कार्डवर घेता येईल.

२) दिलेल्या मुदतीत पुस्तक परत न केल्यास प्रत्येक दिवशी १ रुपया दंड आकारण्यात येईल.

३) उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना किमान २ व जास्तीत जास्त ४ क्रमिक पुस्तके वर्षासाठी देण्यात येतील.

४) विद्यार्थ्यांना दिलेली सर्व पुस्तके वार्षिक परीक्षेपूर्वी परत करणे आवश्यक आहे.

५) ग्रंथपालांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) जे विद्यार्थी परीक्षा फॉर्म भरणार नाहीत. त्यांना परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत संपल्यानंतर लगेच सर्व पुस्तके परत करावी लागतील.

७) जे विद्यार्थी परिक्षा फॉर्म न भरता पुस्तके परत करणार नाहीत त्यांना परीक्षा फॉर्म भरण्याची मुदत संपल्याच्या दुसऱ्या दिवसापासून दर पुस्तक दर दिवशी १ रुपया दंड आकारला जाईल.

८) नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस ओळखपत्राचे नुतणीकरण करावे लागेल.

९) ग्रंथालय अमानत ३१ मार्चपूर्वीच पुस्तके जमा केल्यावर परत घेता येईल.



## बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट जि.नादेड

## :: वरिष्ठ महाविद्यालय (प्राध्यापक वृंद) ::

| नांव | पद | विषय |
|---|---|---|
| डॉ.एस.के.बेंबरेकर | प्राचार्य | विभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र |
| प्रा.यु.जी.इंगोले | सहयोगी प्राध्यापक | विभाग प्रमुख गणित |
| डॉ.के.जी.कारामुंगे | सहयोगी प्राध्यापक | विभाग प्रमुख रसायनशास्त्र |
| डॉ.ए.पी.भालेराव | सहयोगी प्राध्यापक | रसायनशास्त्र |
| डॉ.ए.टी.कांबळे | सहयोगी प्राध्यापक | प्राणीशास्त्र |
| डॉ.जि.बी.लांब | सहयोगी प्राध्यापक | गणित |
| प्रा.आर.एम.नेम्माणीवार | सहयोगी प्राध्यापक, उपप्राचार्य | विभाग प्रमुख भौतिकशास्त्र |
| प्रा.के.व्ही.मिरासे | सहाय्यक प्राध्यापक | विभाग प्रमुख इतिहास |
| डॉ.एस.आर.शिंदे | सहाय्यक प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र |
| प्रा.एम.आय.पवार | शारीरिक शिक्षक | शारीरीक शिक्षण |
| प्रा.एम.के.जोनीपेल्लीवार | सहाय्यक प्राध्यापक | विभाग प्रमुख इंग्रजी |
| प्रा.एम.एस.राठोड | ग्रंथपाल | ग्रंथपाल |
| प्रा.पी.एल.शेरे | सहाय्यक प्राध्यापक | मराठी |
| डॉ.एस.एल.दिवे | सहाय्यक प्राध्यापक | विभाग प्रमुख वाणिज्य |
| प्रा.एस.एस.माने | सहाय्यक प्राध्यापक | हिंदी |
| प्रा.पी.डी.घोडावाडीकर | सहाय्यक प्राध्यापक | इंग्रजी |
| प्रा.जी.एस.वानखेडे | सहाय्यक प्राध्यापक | हिंदी |
| प्रा.ए.जी.हटकर | सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य |
| प्रा.एस.यु.जाधव | सहाय्यक प्राध्यापक | समाजशास्त्र |
| प्रा.वाय.व्हि.सोमवंशी | सहाय्यक प्राध्यापक | संगणकशास्त्र |

***

## बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट जि.नादेड

### :: कनिष्ठ महाविद्यालय (प्राध्यापक वृंद) ::

| अ.क्र. | नांव | पद | विषय |
|---|---|---|---|
| १) | श्री पी.एन.उत्तरवार | शिक्षक | भौतिकशास्त्र |
| २) | श्री डी.पी.चंदेले | शिक्षक | जीवशास्त्र |
| ३) | श्री सी.जी.दमकोंडवार | शिक्षक | रसायनशास्त्र |
| ४) | श्रीमती डॉ.आर.आर.कोमावार | शिक्षक | राज्यशास्त्र |
| ५) | श्री व्हि.के.खुपसे | शिक्षक | समाजशास्त्र |
| ६) | श्री ए.एन.पाटील | शिक्षक | भूगोल |
| ७) | श्री डी.टी.चाटे | शिक्षक | संरक्षणशास्त्र |
| ८) | श्री पी.एम.येरडलावार | शिक्षक | राज्यशास्त्र |
| ९) | श्री सय्यद काझी | शिक्षक | वाणिज्य |
| १०) | श्रीमती एल.एन.पेंडलवाड | शिक्षक | शिक्षणशास्त्र |

***



## बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किनवट जि.नांदेड

### :: शिक्षकेत्तर कर्मचारी ::

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १) | श्री आर.के.धात्रक | कार्यालयीन अधिक्षक |
| २) | श्री सी.के.जाधव | मुख्य लिपीक |
| ३) | सौ.वाय.एन.कुमरे | वरिष्ठ लिपीक |
| ४) | श्री डी.व्ही.खंदारे | कनिष्ठ लिपीक |
| ५) | कु.ओ.जी.शिरपुरकर | सेविका |
| ६) | श्री एन.जी.पवार | प्रयोगशाळा सहायक |
| ७) | श्री बी.डी.चव्हाण | ग्रंथालय परिचर |
| ८) | श्री के.एन.पिंपरे | प्रयोगशाळा परिचर |
| ९) | श्री डी.ए.वाघाडे | प्रयोगशाळा परिचर |
| १०) | श्री एम.एस.लोकडे | प्रयोगशाळा परिचर |
| ११) | श्री जी.एन.पवार | ग्रंथालय परिचर |
| १२) | श्रीमती लक्ष्मीबाई पुट्ठावार | सेविका |
| १३) | श्री एन.एम.कोकुलवार | सेवक |

****

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

## Swami Ramanand Teerth Marathwada University

Nanded - 431606, MAHARASHTRA STATE, INDIA

P.G. Section

## ACADEMIC CALENDAR FOR 2019-2020

1. All Affiliated Colleges, conducted Colleges & Recognised Institutions

| | | | |
|---|---|---|---|
| First Term | 17/06/2019 | To | 09/11/2019 |
| Vacation | 10/11/2019 | To | 03/12/2019 |
| Second Term | 04/12/2019 | To | 01/05/2020 |
| Vacation | 02/05/2020 | To | 15/06/2020 |

2. All Affiliated Colleges of Engineering & Pharmacy

| | | | |
|---|---|---|---|
| First Term | 02/07/2019 | To | 28/11/2019 |
| Vacation | 29/11/2019 | To | 25/12/2019 |
| Second Term | 26/12/2019 | To | 31/05/2020 |
| Vacation | 01/06/2020 | To | 30/06/2020 |

3. All Affiliated Law Colleges

| | | | |
|---|---|---|---|
| First Term | 01/07/2019 | To | 11/11/2019 |
| Vacation | 12/11/2019 | To | 06/12/2019 |
| Second Term | 07/12/2019 | To | 15/05/2019 |
| Vacation | 16/05/2020 | To | 30/06/2020 |

4. Campus Schools & Sub Campus

| | | | |
|---|---|---|---|
| First Term | 10/06/2019 | To | 23/11/2019 |
| Vacation | 25/11/2019 | To | 15/12/2019 |
| Second Term | 16/12/2019 | To | 30/04/2020 |
| Vacation | 02/05/2020 | To | 13/06/2020 |

Admission schedule for all affiliated colleges including constitunet colleges (Excluding professional courses)

| S.N. | Particulars | UG | PG |
|---|---|---|---|
| 1. | Commencement of Admission | 01/6/2019 | 15/6/2019 |
| 2. | Last Date of submission of Application | 07/6/2019 | 19/6/2019 |
| 3. | Dispaly of 1st Merit List | 10/6/2019 | 21/6/2019 |
| 4. | Last Date Payment of Fees & submission of documents of 1st Merit List | 12/6/2019 | 25/6/2019 |
| 5. | Dispaly of 2nd Merit List | 13/6/2019 | 27/6/2019 |
| 6. | Commencement of Classes UG | 20/6/2019 | ------ |
| 7. | Last Date payment of fees & submission of documents of 2nd Merit List | 15/6/2019 | 29/6/2019 |
| 8. | Spot Admission & Last date of admission | 17/6/2019 | 01/7/2019 |
| 9. | Commencement of Classes PG | 18/6/2019 | 02/7/2019 |
| 10. | Last Date of Submission of Eligibility Form | 31/8/2019 | 31/8/2019 |



स्थापना : १९७२

किनवट शिक्षण संस्था किनवट जि.नांदेड द्वारा संचलित,

# बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

(कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विभाग)

संस्थापक अध्यक्ष : स्व.उत्तमरावजी राठोड

## : महाविद्यालय विकास समिती :

| | |
|---|---|
| मा.श्री प्रफुल्ल प्रकाशराव राठोड | अध्यक्ष |
| मा.श्री एस.एम चाडावार | सदस्य |
| डॉ.एस.के.बेंबरेकर | प्राचार्य–सचिव |
| प्रा.आर.एम.नेम्मानीवार | विभाग प्रमुख |
| डॉ.एस.आर.शिंदे | I.Q.A.C. समन्वयक |
| डॉ.जी.बी.लांब | शिक्षक प्रतिनिधी |
| डॉ.पी.एल.शेरे | शिक्षक प्रतिनिधी |
| डॉ.शुभांगी दिवे | शिक्षक प्रतिनिधी |
| श्री आर.के.धात्रक | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |
| श्री व्ही.एम.शिंदे | शिक्षण तज्ञ |
| सौ.भावना दिक्षीत | समाजसेविका |
| श्री प्रशांत चाडावार | उद्योजक |
| श्री योगेश सोमवंशी | संशोधक |

## : शाळा समिती :

| | |
|---|---|
| मा.श्री प्रफुल्ल प्रकाशराव राठोड | अध्यक्ष |
| मा.श्री शंकररावजी चाडावार | सदस्य |
| मा.श्री जसवंतसिंग सोखी | सदस्य |
| मा.श्री मक्सुद आलम | सदस्य |
| डॉ.एस.के.बेंबरेकर | प्राचार्य–सचिव |
| प्रा.सौ.आर.आर.कोमावार | शिक्षक प्रतिनिधी |
| सौ.यमुना कुमरे | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |